# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ७१–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. आदिलशा मिरासो पाटील ,<br>मु.पो. व्हसपेठ , ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. आदिलशा मिरासो पाटील , मु.पो. व्हसपेठ ता. जत, जि. सांगली यांनी नवीन घरगुती वीज कनेक्शन मिळण्यासाठी वि.प.कडे दि. ४.१.२०१० ला अर्ज केला व त्यासाठी भरावी लागणारी प्रोसेसिंग फी रु. २५/– भरली. त्यानंतर अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २२.१.२०१० रोजी रितसर अर्ज दाखल केला. अंतर्गत कक्षाने दि. २९.१.२०१० रोजी आदेश पारित केला. अंतर्गत कक्षाने विहीत नमुन्यात चलन द्यावे, विलंब झाल्यास भरपाई देण्यात यावी असे आदेश केले. आदेशाची पूर्तता न झालेने व नाराजीने प्रस्तुतचा अर्ज या मंचाकडे दि. १२.३.२०१० दाखल केला व वि.प.विरुध्द चलन मिळावे, वीज कनेक्शन मिळावे व विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मागणी केली.

वि.प.ने आपल्या दि. २९.४.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदारास दि. २८.४.२०१० रोजी चलन दिल्याचे म्हटले आहे आणि तक्रारदार याने पैंसे व टेस्ट रिपोर्ट दिल्यानंतर नियमाप्रमाणे त्यांना कनेक्शन देण्यात येईल

मंचासमोर प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी आज दि. ४.५.२०१० रोजी घेतली असता तक्रारदार गैंरहजर. वि.प.तर्फे श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग, श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग उपस्थित. त्यांनी विलंब झाल्याचे मान्य केले आहे मात्र चलन दिल्यानंतर तक्रारदार यांनी पैंसे भरले नाहीत व टेस्ट रिपोर्ट दिला नाही असे सांगितले. सुनावणीचेवेळी श्री. मैंलापुरे यांनी तक्राराचा तक्रार मागे घेत असल्याबद्दलचा फॅक्स मेसेज आज येण्याची शक्यता आहे असे प्रतिपादन केले. त्यानुसार तक्रारदाराचे वतीने दोन फॅक्स मेसेज आज रोजी दि. ४.५.२०१० रोजी दुपारी १.३० वाजता व सायंकाळी ५.० वाजता मंचात वि.प.च्या विभागीय कार्यालयाकडून प्राप्त झाले. त्यामुळे दि. ४.२.२०१० ते २८.४.२०१० या कालावधीतील विलंबापोटी भरपाई तक्रारदार मागे घेत आहे, भरपाई मागणार नाही असे लिहून दिले आहे. तसेच वि.प.विरुध्द कोणतीही तक्रार नाही असे म्हटले आहे. परंतु तक्रारीत वीज कनेक्शन मिळावे अशी मागणी केली आहे, त्याबद्दलचा त्याचा हक्क अबाधित राहतो. चलन देवूनही त्याने चलन भरले नाही व टेस्ट रिपोर्ट सादर केला नाही. त्यामुळे तक्रारदार याने पैंसे भरल्यानंतर व टेस्ट रिपोर्ट दिल्यानंतर नियमाप्रमाणे, प्राधान्यक्रमानुसार वीज कनेक्शन मिळणे जरुरी आहे व वि.प.स तसे आदेश देणे योग्य होईल. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदाराची विलंबापोटी भरपाईची मागणी त्याने फॅक्स मेसेज देवून सोडून दिल्याने फेटाळण्यात येत आहे.

३) वितरण कंपनीस असे आदेश देणेत येत आहेत की, तक्रारदार याने पैंसे भरल्यानंतर व टेस्ट रिपोर्ट दिल्यानंतर प्राधान्यक्रमानुसार नियमाप्रमाणे त्यांस वीज कनेक्शन देण्यात यावे.

४) खर्चाबाबत आदेश नाही.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ४.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :